# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आयुक्त यांचे कार्यालय**

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. मनपा/आस्था/ 2850 /2023-24 दि. 20/02/2024

**प्रत्यायोजन आदेश**

**विषय :- "अतिरिक्त आयुक्त" पदाच्या पदभाराबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील कार्यरत "अतिरिक्त आयुक्त" यांचेकडे सोपविलेल्या विविध विभागांचे पदभाराबाबत यापूर्वी पारित केलेले सर्व आदेश याद्वारे अधिक्रमित करून सदरचे नव्याने आदेश पारित करणेत येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ अन्वये खालील दर्शविलेल्या खात्यांचे/ विभागांचे प्रशासन आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळ्या प्रकरणांत विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्य, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणसापेक्ष खालील अतिरिक्त आयुक्त यांच्या नावाखाली दर्शविल्याप्रमाणे या आदेशान्वये सोपविण्यांत येत आहेत.

**अ) श्री. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त**

१. अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन व नियंत्रण
२. मालमत्ता कर
३. स्थानिक संस्था कर
४. वाहन व यांत्रिकी
५. मध्यवर्ती भांडार
६. परवाना
७. जाहिरात
८. लेखापरीक्षण
९. ई-टेंडरिंग, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा
१०. बाजार लिलाव
११. पे अॅण्ड पार्क, भुईभाडे
१२. समाज विकास (NULM सह)
१३. क्रिडा आणि सांस्कृतिक कार्य
१४. पशुवैद्यकीय
१५. अभिलेख
१६. ग्रंथालय
१७. सुरक्षा

**ब) श्री. अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त**

१. सामान्य प्रशासन व आस्थापना
२. घनकचरा व्यवस्थापन
३. सार्वजनिक आरोग्य
४. परिवहन
५. उद्यान
६. अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन
७. पर्यावरण
८. मिळकत
९. शिक्षण
१०. संगणक व माहिती तंत्रज्ञान
११. लेखा
१२. महिला व बाल कल्याण
१३. निवडणूक व जनगणना

उपरोक्त अधिकाऱ्यांनी वरील विभागांचे कामकाज वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकारांच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. वित्तीय बाबीशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरण मंजूर करण्यापूर्वी मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरीक्षक यांची सहमती घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पूर्व मान्यतेने व मंजूरीनेच पाठविणे बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त यांनी आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी ह्या सर्व प्रयोजनांसाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत; असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ नुसार मानले जाईल.

**(संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

१. **श्री. संभाजी पानपट्टे,** अतिरिक्त आयुक्त
२. **श्री. अनिकेत मानोरकर,** अतिरिक्त आयुक्त

प्रत :- माहितीस्तव.

१. उपायुक्त (सर्व)
२. सर्व विभाग प्रमुख / खातेप्रमुख
३. आदेशनस्ती.